# २८) ज्ञानेश्वरीतील व्यक्तिरेखा : श्रीकृष्ण व अर्जुन

**ह. भ. प. श्री. सुभाष महाराज गेठे**

## श्रीकृष्ण

**जो धर्म कीर्ति धवळु। अगाध दातृत्वे सरळु।**
**अतुळ बळे प्रबळु। बळी बंधनु।।**

भगवंतास ज्या अनेक नावांनी ज्ञानेश्वरीत गौरविले आहे, त्या सर्व विशेषणांचा विचार पाहता ज्ञानेश्वरीतील श्रीकृष्ण हा आगळावेगळाच दिसतो. आज आपण श्रीकृष्ण या विषयास प्रारंभ करत आहोत. मागील विषय आपण अतिशय जिज्ञासेने श्रवण केलेत. धृतराष्ट्राचा मोह, संजयाची समरसता हे विषय श्रीज्ञानदेवांनी वेळोवेळी कसे हाताळले आहेत आणि श्रीमद् भगवद्गीतेपेक्षाही आपल्या ज्ञानेश्वरीत त्यांना कसे उच्च प्रतीच्या भाषेत दृष्टान्तांसह रेखाटले आहे, हे आपण पाहिले.

श्रीकृष्णांची बीजवाक्ये पाहताना श्रीज्ञानदेवांची भाषा फारच मजेदार आहे. नवव्या अध्यायाच्या शेवटी ते म्हणतात, अहो श्रोतेजन, आता श्रीकृष्णाची बीजवाक्ये पाहू व त्यात संजयाच्या सात्त्विकतेची भर पडल्यानंतर हा प्रमेयविकास कसा झाला हे बघायचे आहे. धान्य आणि बीज यांत जसा फरक असतो, तसे शब्द आणि बीजवाक्ये यांतही फरक असतो. जसे बीज हे शेतात उगवण्याकरिताच पेरावयाचे असते आणि ते पेरल्यानंतर उगवतेच, तसे श्रीकृष्णांची बीजवाक्ये ही परिणामांकरिताच योजलेली आहेत म्हणून ती परिणाम करणारच.

अशा बीजवाक्यांची योजना करणारे भगवान हे दातृत्वाने अगाध

आहेत, म्हणून त्यांना 'धर्मकीर्तिधवळ' म्हटले आहे.

श्रीसंत एकनाथ महाराज धर्माचा रंग सांगताना **'आले घरा, ढवळा धरा,'** अशा शब्दांत धर्माला ढवळा म्हणतात. धर्म हा ढवळा आहे म्हणून ज्ञानदेवांनी भगवंताला तसे विशेषण दिले. भगवंताला दिलेली वेगवेगळी विशेषणे असलेल्या ३३० ओव्या ज्ञानेश्वरीत आहेत. त्यातील काही विशेषणे येथे देत आहे. अच्युत, अनंत, अतिबल, अधोक्षज, अनंत, अनंतविक्रम, अप्रमेय, आदिगुरू, कमलापती, कमलायतन, करुणारस, कल्होळ, कलुषकेसरी, कंसहंता, कालयंत्र सूत्री, कृपामृत सजळ, कृपापियुष, कृष्णदृम, गंभिरू, गुणसमुद्र, चक्रवर्ती, चतुरचित्तचमत्कार, जगदीश्वर जगदादिकंद, जगदुदर दोंदिल, जगजेठी, जगन्नाथ, निगमपद्म पराग, नैष्कर्म्यसुख ठेवा, पंचविसावा, ब्रहा कटाहधात्री, ब्रह्मविद्या रावो, भूत विश्राम, यज्ञांग, यदुनाथ, वीरवरनरहरी अशा अनेक नावांनी भगवंतास गौरविले आहे.

श्रीमद् भागवत महापुराणात सर्व स्कंदांत भगवंताचे वर्णन आहे. परंतु आपल्याला ज्ञानेश्वरीतील भगवान कृष्ण पाहावयाचा आहे.

**ज्ञानोबाराय म्हणतात :**

**तो श्रीकृष्ण वैकुंठींचा। चक्रवर्ती निजांचा।**
**सांगे येरु दैवाचा। आइकतु असे।।२४४।।** अ. १२

'तो' या 'दर्शक' सर्वनामाने त्याला दुरून आणले आणि 'निजाचा चक्रवर्ती' असे म्हणत त्याला हृदयात दाखविले ही ज्ञानोबारायांची शैली आहे. जो गीता सांगणारा आहे त्याच्याच निद्रितेचा घोर म्हणजे 'वेद' होय हेसुद्धा श्रीज्ञानदेवांनी सांगायचे टाळले नाही.

**हा वेदार्थसागरु। जया निद्रिताचा घोरु।**
**तो स्वयें सर्वेश्वरु। प्रत्यक्ष अनुवादला।।७२।।** अ. १

म्हणून भगवद्‌गीतेमध्ये व्यासांनी त्यांना 'श्रीकृष्ण उवाच' असे न म्हणता 'श्रीभगवानुवाच' असे म्हटले आहे. श्रीज्ञानदेवांनी मात्र जसा सिद्धान्त असेल, तसे विशेषण भगवंतास देऊन कधी दूर नेले, तर कधी जवळ आणले. कधीकधी तर तोच ब्रह्म आहे, असे म्हटले आणि असे म्हटल्यास तो दूरचा वाटेल म्हणून की काय त्याचे पुन्हा कृष्ण-अवतार स्वरूपात वर्णन केले.

**जो देवकी-वसुदेवास्तव जाहला। कुमारीसाठी गोकुळी गेला।**
**तो मी प्राणासकट पियाला। पूतनेतें।।२८८।।** अ. १०

या पुढील चार ओव्यांमध्ये क्रमशः भगवंताचे चरित्र दिले आहे.

भगवान या प्रकारचे चरित्र का करतात? यावर प. पु. श्री. डोंगरेजी महाराज म्हणत असत की, भक्तांना आपल्याकडे आकर्षित करण्याकरिता भगवंतांचे चरित्र आहे. भगवान नित्य तृप्त आहे. त्याला सामान्य जीवांप्रमाणे भोगात प्रवृत्ती धारण करण्याची काय गरज, तरी तो तशी लीला करतो. याचा अर्थ, सर्व जीव हे संसारात आहेत. भोगामध्ये अडकलेले आहेत त्यांना स्वतःकडे आकर्षित करण्याकरिता थोडे त्यांच्यासारखे वागणे आणि नंतर पुन्हा त्याग दाखवून विषय नश्वर आहे, हे सिद्ध करणे हे या चरित्राचे मुख्य उद्दिष्ट आहे.

श्रीकृष्ण अवतारात आठ या संख्येला महत्त्व आहे. अष्टमीला जन्म आहे. आठवा अवतार, आठवा पुत्र, आठ वर्षांचे प्रकटले असे अनेक प्रकार आहेत, तसे चरित्रसुद्धा आठ प्रकारांत आहे, नुसती आठ नावे पाहिली तरी आपणास समजेल. बाळकृष्ण, लालकृष्ण, राधाकृष्ण, गोपाळकृष्ण, श्रीकृष्ण, युगलकृष्ण, भगवान-कृष्ण आणि योगेश्वर-कृष्ण.

भगवंताच्या रूपांवरून अनेक संप्रदायसुद्धा निर्माण झालेले

दिसतात. मध्वाचार्य, वल्लभाचार्य हा त्यातलाच भेद आहे. परंतु ही सर्व रूपे एकाच परमात्मस्वरूपाची आहेत. सर्व रूपांना धारण करण्यात भगवंताचा जो हेतू आहे, तो ज्यांना यथार्थ समजला तेच खरे संत.

अध्यात्म सांगणाऱ्या भगवंतांच्या विभूती कशा आहेत, हे सांगताना श्रीज्ञानदेवांनी 'कुमारीसाठी गोकुळात गेला' असे म्हटले आहे. अर्थात



कंसाच्या कारागृहात भगवान जन्माला आले होते. परंतु तिकडे नंदराजाला त्याच वेळी मुलगी झाली होती. तिला वसुदेवाने गोकुळातून मथुरेत आणले आणि श्रीकृष्णास मथुरेतून गोकुळास नेले.

**फिरविली दोन्ही। कन्या आणि चक्रपाणी।।ना. म।।**

ज्ञानोबाराय चरित्र सांगतात यातच मोठी गंमत आहे. तसे पाहिले तर ज्ञानोबाराय म्हणजे शब्दस्वामी. अध्यात्म सांगताना कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त सांगणे, हे त्यांचे खास वैशिष्ट्य. चरित्रापेक्षा अध्यात्माला अधिक प्राधान्य देणे, हा त्यांचा मूळ स्वभावच आहे. तरीसुद्धा येथे मात्र या ओव्यांमध्ये ते चरित्र गातात, कारण हे चरित्र गीता सांगणाऱ्या भगवंताचे आहे. गीता सांगणारे भगवान हे ज्ञानी आहेत, वक्ते आहेत, देव आहेत तसे ते उदारही आहेत. असे वर्णन अर्जुनाच्या मुखातून गाईले आहे.

**तुझे औदार्य जाणो स्वतंत्र। देता न म्हणसी पात्रापात्र।**
**पै कैवल्या ऐसे पवित्र। वैरीयाही दिधले।।९८।।** अ. ११

या पुढील क्रमशः ११ ओव्यांमध्ये पौराणिक उदाहरणे देऊन भगवंताचे औदार्य सांगितले आहे. मागे सहाव्या अध्यायात षड्गुण-ऐश्वर्य असे वर्णन केले आहे.

**आइका यश, श्री औदार्य। ज्ञान वैराग्य ऐश्वर्य।**
**हे सहा ही गुणवर्य। वसती जेथ।।**

या सर्व गुणांचे ज्ञानेश्वरीत ठिकठिकाणी वर्णन आले आहे. संजय धृतराष्ट्रास म्हणतो की, महाराज, भगवंताला अर्जुनाचे केवढे वेड लागले आहे पहा. हा रुसतो तर त्याला समजावून सांगतो आहे. त्रिभुवनात जणू अर्जुनच याचा प्रिय श्रोता आहे, असे दिसत आहे.

अर्जुनाच्या अवस्थेवरून तर भगवंताला अतिशय सुंदर उपमा दिल्या आहेत. माउली म्हणतात, जसा सर्पदंश व्हावा आणि तो

विषबाधाग्रस्त माणूस मरणाच्या अवस्थेत जावा आणि तितक्यात विष उतरवणारा मांत्रिक अथवा गारुडी यावा तसा अर्जुन महामोहरूपी काळसर्पाने ग्रासलेला आहे आणि त्याला वाचवण्याकरिता, जो दृष्टीनेच विषबाधा नष्ट करू शकेल असा, श्रीहरी गारुडी धावून आला आहे.

**हे जाणोनि ऐसी प्रौढी। जो दृष्टी सवेचि विष फेडी।**
**तो धावया श्रीहरी गारुडी। पातला की।।७२।।** अ. २

भगवंतास 'श्रीहरी गारुडी' असे संबोधन दिले आहे. यावरून ज्ञानोबारायांच्या शब्दभांडारात श्रीमद् भागवतापेक्षाही काही आगळावेगळा शब्दभांडाराचा खजिना आहे. त्या शब्दभांडारातून श्रीज्ञानदेवांनी आपल्या ज्ञानेश्वरीत भगवंताचे जे रूप साकार केले आहे, त्या रूपास 'ज्ञानदेवांचा श्रीकृष्ण' असे म्हणावयास हरकत नाही.

मागे वर्णन केल्याप्रमाणे श्रीकृष्णाची आठ नावे आहेत. त्यात जर गोपाळकृष्ण हा गोपाळांचा तर गीतेतील कृष्ण हा अर्जुनाचा आहे, असे का म्हणू नये? ज्ञानोबाराय ज्ञानेश्वरीत लक्ष्मीसह भगवंताचे वर्णन करतात.

लक्ष्मी नाहे ३/२६८, लक्ष्मीयेचा कांतु १०/२२४, लक्ष्मीपती २/२८९, लक्ष्मीभर्ता १३/७, लक्ष्मीकांत ५/१३, लक्ष्मीनाह १५/४३६, लक्ष्मीलिलू १०/२५२ या सर्व ओव्या आपण प्रत्यक्ष पाहाव्या, म्हणजे अधिक आनंद मिळेल.

अकराव्या अध्यायात अर्जुन भगवंताकडे विश्वरूप पाहण्यासंबंधी इच्छा प्रदर्शित करतो आणि भगवान विश्वरूप दाखवतात. त्यानंतर भगवंताचे मोठेपण पाहून, 'आपल्याला भगवंतांचे मोठेपण कळले नाही!' असा खेद अर्जुन व्यक्त करतो. तेथे माउलींनी या दोन परममित्रांचे सख्य वर्णन केले आहे. अर्जुनाच्या मुखात ज्ञानोबारायांनी हे शब्द घातले आहेत,

**यया कौरवांचिया घरा। शिष्टाई धाडीलासी दातारा।**
**ऐसा वणिजे साठी जगदिश्वरा। विकिलासी आम्ही।।५४२।।** अ. ११

तेथे बरेच वर्णन आहे. हे भगवान, तू म्हणजे योगियांच्या समाधीचे धन आहेस. पण मी मूर्खपणे तुला ओळखले नाही. मी माझे किती अपराध सांगावे, मी तुझ्यासह कोलकाठी खेळलो, झोंबीलोबी खेळलो आणि खेळता खेळता कित्येक वेळा भांडलो. चांगले असेल ते तुझ्याजवळून हिसकावून घेत होतो आणि बोलता-बोलता तुझ्याशी आरेरावीची भाषाही करत होतो. काही वेळा भांडण झाल्यावर तर 'तू कोण लागून गेला आहेस' असे सुद्धा बोललो.

**चांग ते उरावरी मागो। देवासी की बुद्धी सांगो।**
**तेवीची म्हणो काय लागो। तुझे आम्ही।।५४९।।** अ. ११

या वर्णनात माउलींनी भगवंताला 'अर्जुनाचा मित्र' या नात्याने त्याच्या ''ईश्वरत्व'' या अत्युच्य पदापासून, खूपच दूरचा श्रीकृष्ण दाखविला आहे.

भगवंत भक्तांसाठी काय करू शकतो हे दाखवण्यासाठी माउलींनी असा भगवंत दर्शविला आहे. भगवंताचे याप्रमाणे भक्तप्रेमी कृष्ण, अर्जुनसखा कृष्ण, अर्जुनाचा मनोधर्म कृष्ण, चतुरचित्त चमत्कार कृष्ण, सारथी कृष्ण, भक्तकाम कल्पदृम कृष्ण, सद्गुरू कृष्ण, युक्तिदर्शक श्रीकृष्ण, षड्गुण चक्रवर्ती कृष्ण, भक्त चकोरचंद्र कृष्ण असे भगवंताच्या वेगवेगळ्या रूपांचे वर्णन आहे. काही संबोधने तर अगदीच बोधप्रद वाटण्यासारखी आहेत. पंचविसावा, बुधवनवसंतू, परचित्त लक्षणाचा ठावो, नैष्कर्म्यसुख ठेवा, त्रिभुवनैकनरेंद्र, गुणसमुद्र, चराचर परमगुरू अशा अर्थपूर्ण नावांनी संबोधून माउलींनी ज्ञानेश्वरीतून एक आगळा श्रीकृष्ण जगासमोर मांडला आहे. या सर्व संबोधनांतून गीता सांगणारा भगवान परमात्मा हाच ईश्वर आहे, हाच ब्रह्म आहे

आणि हाच देवही आहे.

जगदुत्पत्तीच्या कार्यानुसार आणि माया अंगीकारानुसार ब्रह्म, ईश्वर, देव ही भगवंताची वेगळी संबोधने आहेत. पण भगवान जेव्हा जीवांना उपदेश करताना 'मला शरण या' आणि 'मीच एक शरणांगतास शरण्य आहे' असे म्हणतात, तेव्हा तोच ब्रह्म आहे असे स्वरूपदर्शक वर्णन आहे.

आपले खरे अस्तित्व मायेच्या पलीकडे आहे, असे जेव्हा भगवान अर्जुनाला म्हणतो, तेव्हा तो शुद्ध स्वरूपवान सच्चिदानंद रूपातून उपदेश करतो, असे माउलींनी दर्शविले आहे. मात्र ते रूप पाहणाऱ्यांनी कल्पनारहित होऊन पाहिले तरच कळेल.

**आमुचा प्रकृती पैलकडील भावो ।**
**जरी कल्पनेविण लागसी पाहो ।**
**तरी मज माजी भूते हेही वावो ।**
**जे मीची सर्व म्हणोनी॥९॥**

हे सांगणारे भगवान, हेच सचिदानंद ब्रह्म आहे, हे सांगून ज्ञानोबारायांनी भगवंताला पुन्हा मूळ स्वरूपात नेऊन ठेवले आहे. पण विभूती सांगताना, यादवांमधील कृष्ण तो मीच आहे म्हणून कुमारींसाठी गोकुळात गेलो, हे सांगून माउलींनी पुन्हा त्याला आपल्या सर्वांच्या जवळ आणले आहे. खरे तर जशी भक्ताची प्रतिती किंवा इच्छा, तसाच परमात्मा असतो, हेच त्याचे खरे रूप असते.

**होय भक्ती केला तैसा। पुरवी धरावी ते इच्छा॥** संत तुकाराम महाराज

भक्तासाठी परमात्मा आपले मूळ स्वरूप सोडून लहान होतो. तेव्हाच त्याला सगुण साकार म्हणतात. निर्गुण निराकार, सगुण निराकार, सगुण साकार ही त्याची नावे आहेत. त्यांपैकी सगुण साकार होतो भक्ताकरिता, सगुण निराकार होतो जगदुत्पत्तीकरिता

आणि निर्गुण निराकार असतो मोक्षाकरिता.

भगवंताच्या मुखातून ज्ञानोबाराय म्हणतात,

**मी अजत्व परते ठेवी। अव्यक्त पणही नाठवी।**
**जे वेळी धर्मातें अभिभवीं। अधर्मु हा।।**

याच श्रीकृष्ण अवतारात भगवंताचे 'परिपूर्णतम' असे वर्णन गर्गसंहितेमध्ये केले आहे. **परिपूर्ण तमः साक्षात् श्रीकृष्णो नान्य एव हि । एक कार्यार्थमागत्यं कोटिकांर्य च कारह।।** अर्थात, ज्याला जगात सुखवृद्धी करण्यासाठी सर्व काही करता येणे शक्य आहे असा तो. अज्ञानांधकारासाठी ज्ञानप्रकाश निर्माण करणे, अधर्म निवृत्तीसाठी धर्म प्रस्थापित करणे, दुष्टांच्या निर्दाळणासाठी युद्ध करणे यांपैकी कोणतेही कार्य करणे. काहीच अशक्य नाही म्हणूनच भगवान म्हणतात,

**नुघडता बाळपणाची फुली। मिया अदानवी सृष्टी केली।**
**करी गोवर्धन उचलोनि उमानिली। महेंद्र महीमा।।**

परंतु भगवंताचे सर्वांत मोठे कार्य जर कोणते असेल, तर ते श्रीमद् भगवद्गीता प्रकट करणे. याबद्दल भगवान अर्जुनाला म्हणतात की, हे अर्जुना, माझ्या मस्तकावर अनेक काळापासून एक निक्षेप होता, तो तुझ्यासारख्या आस्थानिधीमुळे मला साकार करता आला.

येथे श्रीज्ञानोबाराय रूपक करतात आणि भगवंताच्या मुखातून गीता निर्मितीसंबंधी गीतारूपी गोदावरी आणण्यास कारण ठरलेला एक गौतम अशी उपमा अर्जुनाला देतात.

भगवान शंकराच्या डोक्यावर गंगा असल्यामुळे शिव-पार्वती यांच्यात विवाद झाला, त्यामुळे भगवान शंकरास सारखे असे वाटू लागले की, या गंगेला खाली उतरवावे. परंतु तिला खाली कसे उतरवावे? गणपतीने एक युक्ती केली. एका गणाची गाय केली आणि गौतमाच्या शेतात सोडली. गौतमाने एक दर्भ फेकून मारला

आणि ती मरण पावली. त्यामुळे गौतमाने शंकराची तपश्चर्या केली.

गौतमाच्या तपामुळे भगवान शंकराला हा निक्षेप काढता आला. त्यांनी ब्रह्मगिरीच्या माथ्यावर जटा आपटल्या आणि गंगेला खाली सोडले. तसे भगवान श्रीकृष्ण म्हणतात की, हे अर्जुना, चैतन्यरूपी शंभूच्या माथ्यावर जो निक्षेप प्रदीर्घ काळ होता, तो खाली उतरवण्याखेरीज पर्याय नव्हता. पण त्यासाठी कारणीभूत होण्यास कोणी नव्हते. ज्या गंगेच्या पाण्याने अनंत जीवांचा उद्धार होऊ शकतो, ती जटेत राहून गेली होती. तशी ही ज्ञानरूपी गीतागंगा माझ्या हृदयात अनंत काळापासून सांगायची राहून गेली होती. याला ज्ञानोबारायांनी निक्षेप म्हटले आहे. ही गोष्ट विश्वाच्या कल्याणाची खरी, पण ती प्रकट करण्यासाठी, अर्थात, ती सांगण्यास प्रवृत्त करण्यासाठी माझ्यासमोर कोणी उत्तम श्रोताच नव्हता. परंतु ज्याप्रमाणे गंगा आणण्यासाठी भगीरथाच्या चार पिढ्यांनी तप केले किंवा गौतमाने गोदावरीसाठी तप केले व त्यामुळे गोदावरी जटेतून खाली आली, त्याप्रमाणे अर्जुना, श्रीमद् भगवद्गीता प्रकट होण्याइतकी आस्था तुझ्या ठिकाणी निर्माण झाली आणि त्यामुळे मला माझा हा निक्षेप काढता आला.

**मज चैतन्य शंभूचा माथा। जो निक्षेपु होता पार्था।**
**तया गौतमु झालासी आस्था। निधी तू गा।।**

इतके मोठे पौराणिक रूपक साकार करून ते ओवीरूप शब्दांमध्ये यमकसाध्य करून श्रीज्ञानोबाराय मांडतात, यात श्रीभगवान श्रीकृष्णाचा मोठेपणा म्हणावा की,

ज्ञानोबारायांचा मोठेपणा म्हणावा, हेच कळत नाही.

खरे तर हे दोघे एकच आहे. ज्यांनी गीता सांगितली ते भगवानच गीता सांगण्याकरिता ज्ञानोबारायांच्या रूपाने संत झाले.

**तोची अवतार धरी अलंकापुरी ।**

**ज्ञानाबाई सुंदरी तारावया।** संत एकनाथ महाराज

या दोघांच्या अवतारकार्यातून साकार झालेले ज्ञान म्हणजेच ज्ञानेश्वरी होय. या ज्ञानेश्वरीतील श्रीकृष्ण परमात्मा आपल्या ज्ञानरूपी बीजवाक्यांद्वारे श्रोत्यांना प्रमेयपिकांचे धन देणारा आणि श्रवणसुखाची दिवाळी करणारा चराचर परमगुरू होय.

भगवान अर्जुनास म्हणतात की, तू प्रज्ञेचा प्रियोत्तम आणि ब्रह्मविद्येचा विश्राम आहेस. इतकेच नव्हे तर माझ्या मनात गीताज्ञान येण्यापूर्वी तुझ्या मनातील आस्था समजून मला तेच सांगावेसे वाटावे इतके तू आणि मी ऐक्यस्वरूप झालो आहोत. त्यामुळे तू म्हणजे माझा स्वाभाविक मनोधर्मच आहेस.

**जो प्रज्ञेचा प्रियोत्तमु। ब्रह्म विद्येचा विश्रामु।**

**सहचरु मनोधर्मु। देवाचा जो।।३३।।** अ. १७

असे म्हणण्यामध्ये देवाचा मोठेपणा आहे की अर्जुन आणि भगवंत यांच्या श्रोता-वक्ता या नात्याने झालेल्या ऐक्याचा हा परिणाम आहे, का श्री ज्ञानेश्वर महाराजांचे त्या दोघांतील परमोच्च प्रेम प्रतिपादन करण्याचे कौशल्य आहे, हे आपण जाणकार श्रोत्यांनीच जाणून घ्यावे म्हणजे बरे होईल. मात्र महाभारतातील श्रीकृष्ण, या विषयाकडे पाहताना द्वारकेतील कृष्ण, मथुरेतील श्रीकृष्ण, गोकुळातील श्रीकृष्ण या सर्वांपेक्षा अर्जुनाला बोध देणारा गीतेतील श्रीकृष्ण आणि त्याहीपेक्षा ज्ञानेश्वरीतील श्रीकृष्ण काही वेगळाच आहे यात शंका नाही.

कृष्णाकृतिचिया मोडी, कृष्णदेव, कृष्णद्रुम, कृष्णनाथ, कृष्णपण, कृष्णमूर्ति, कृष्णरुपडे, कृष्णवचनोक्ति, कृष्णवाक्य, कृष्णसुख, कृष्णहृदयासी खेळ इत्यादी शब्दांनी ज्ञानेश्वरीमध्ये श्रीकृष्णाला गौरविले आहे.

## अर्जुन :

ऋजुत्व=आर्जवता, हा एक महत्त्वाचा गुण आहे. ऋजुत्व म्हणजे मनाचा सरळपणा होय. अर्जुन हा मनाने सरळ होता म्हणून त्याचे नाव अर्जुन असे ठेवले होते. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायापासून तर अठराव्या अध्यायापर्यंत भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातून अर्जुनाचे जे व्यक्तिमत्त्व शब्दांकित केले आहे, ते विविध अशा भूमिकेतून आपल्याला पाहता येते. त्याच्या (अर्जुन) प्रत्येक भूमिकेत आपल्याला नवीन असे काही मूल्य शिकावयास मिळते. अर्जुन या एकाच विषयावर एक प्रदीर्घ प्रबंध तयार होईल. एवढे तपशीलवार वर्णन सद्गुणांच्या आधारावर केलेले आहे. ज्ञानेश्वरीत अर्जुनाला संबोधून वापरलेली विशेषणे खूप लक्षवेधी आहेत. ती अशी- सखा, विरोत्तम, धर्मअनुज, धनुर्वेदत्र्यंबक, उन्मेखसुलोचन, कृष्णचरणचतुर, विद्याविश्राम, सुजन चक्रवर्ती, सौभाग्यनिधी, कपिध्वज, कुटीलालकमस्तक, त्रिभुवनाच्या दैवा, परिसणेयांचिया राया, अगस्त्य, गौतम, स्वयंबोध कुमुदचंद्र आणि अर्जुनाचळ अशा अर्थपूर्ण विशेषणांनी गौरविले आहे.

'सु' या अक्षरावरून अर्जुनास विविध अशी विशेषणेसुद्धा दिलेली आहेत, ते असे- सुधांश, सुबुद्धी, सुभट, सुहाड, सुभद्र, सुभद्रापती, सुमती, सुभद्राकांत, सुमनस, सुवर्म, सुवर्मशिरोमणी इत्यादी. ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायात अगदी प्रस्तावनेमध्येच श्री ज्ञानदेव श्रोत्यांना उद्देशून म्हणतात, की माझी ज्ञानेश्वरी श्रवण करायची असेल तर अर्जुनाची ऐकण्याची जेवढी योग्यता आहे तेवढी योग्यता आपल्यात असेल त्यांनीच माझ्या बोलण्याकडे लक्ष द्यावे. 'ऐकावे कसे' याच्यातला राजा म्हणजे अर्जुन आहे. तो फक्त ऐकत नाही तर ऐकून ऐकलेले सिद्धांत आपल्या जीवनामध्ये प्रत्यक्ष उतरवितो.

**अहो अर्जुनाचिये पांती। जे परिसणया योग्य होती।**
**तिहीं कृपा करून संतीं। अवधान द्यावे।।६२।।** अ. १

## अर्जुन अगस्ती :

श्रवण करण्याच्या संबंधी अर्जुनाला अगस्ती ऋषींची उपमा दिली आहे. अगस्ती ऋषींनी एका घोटात समुद्र प्राशन केले अशी पौराणिक आख्यायिका आहे. श्रीकृष्णाच्या मुखातून निघालेली अक्षरे ही समुद्राप्रमाणे आहेत. तो अक्षररूपी समुद्र प्राशन करणारा अर्जुन जणू काही दुसरा अगस्तीच आहे, श्रीकृष्ण वचनामृताचा घोट घेण्यास तो समर्थ आहे.

**श्रीकृष्णोक्तोचिया सागरा। हा अगस्तीची दुसरा।**
**म्हणोनी घोट भरू पाहे एकसरा। अघवियांचा।।**

## अर्जुनाचे भाग्य :

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मते अर्जुन हा त्रैलोक्यात एकमेव दैववान आणि भाग्यवान आहे. श्रीकृष्णाने सांगितलेली विवेकाची गोष्ट म्हणजे गीता, त्याचे श्रवण करण्याचे भाग्य अर्जुनाला प्राप्त झाल्यामुळे त्याला भक्तराज असे म्हटले गेले आहे. सर्वश्रेष्ठ श्रीकृष्ण हा वक्ता, सर्वश्रेष्ठ भक्त अर्जुन हा श्रोता आणि विवेकपूर्ण चर्चा म्हणजे श्री गीता असा छान त्रिवेणी संगम अर्जुनाच्या जीवनात जुळून आला. इतके भाग्य तत्कालीन कोणालाही लाभलेले नव्हते. श्रीकृष्णाचे आई-वडील वसुदेव-देवकी, बंधू बलराम, लक्ष्मी, सनकादिक इत्यादिकांना श्रीकृष्णाने गीता सांगितली नाही. गीता श्रवणाचे भाग्य फक्त अर्जुनालाच प्राप्त झाले कारण तो श्रीकृष्ण प्रेमास प्राप्त झाला होता. अर्जुन रागावला तर श्रीकृष्ण प्रेमाने सहन करत. अर्जुन रुसला तर त्याला समजावून सांगत. सर्व पांडवांमध्ये श्रीकृष्ण प्रेम प्राप्त भक्त

आणि शिष्य केवळ एकमेव अर्जुनच होता. श्री ज्ञानदेव अर्जुनासंबंधी बोलतात की, याने असे कोणते सर्वोत्तम पुण्य केले, की त्यामुळे हा या जगदीश्वराच्या निरूपम प्रेमाला प्राप्त झाला आहे.

**आधीची विवेकाची गोठी। वरी प्रतिपादी श्रीकृष्ण जगजेठी।**
**आणि भक्तराजु किरीटी। परिसत असे।।२।।**

**जें न सांगेचि पितया वसुदेवासी। जें न सांगेचि माते देवकीसी।**
**जें न सांगेचि बंधु बळिभद्रासी। तें गुह्य अर्जुनेंसी बोलत।।८।।**

**देवी लक्ष्मीयेवढी जवळीक। परि तेही न देखे या प्रेमाचे सुख।**
**आणि कृष्णस्नेहाचें पिक। यांतेचि आथी।।९।।**

**सनकादिकांच्या आशा। वाढिनल्या होतिया कीर बहुवसा।**
**परी त्याही येणें माने यशा। येतीचिना।।१०।।**

**या जगदीश्वराचें प्रेम। एथ दिसतसे निरुपम।**
**कैसें पार्थें येणें सर्वोत्तम। पुण्य केलें।।११।।** अ. ४

### पुरुषार्थी अर्जुन :

महाभारतकालीन धनुर्योद्ध्यांमध्ये अर्जुन हा सर्वश्रेष्ठ धनुर्वेत्ता होता त्याने आपल्या पराक्रमाने वनवास संपल्यानंतर एकांतवासाच्या शेवटी सर्व कौरव सेनेला परजित केले होते. भगवान शंकराशी युद्ध करून भगवान शंकरास पराजित केले, त्याच्याकडून पाशुपत अस्त्र मिळविले, त्याचप्रमाणे गंधर्वासोबत युद्ध केले, निवात आणि कवच यांच्याशी युद्ध करून त्यांना नेस्तनाबूत केले. श्रीकृष्ण हा अर्जुनाचा सारथी तर हनुमंत अर्जुनाच्या ध्वजावर राहून संरक्षक बनले होते.

**तुवा संग्रामी हरू जिंतीला। निवात कवचांचा ठावो फेडीला।**
**पवडा तुवा केला। गंधर्वासी।।**

**चारित्र्यशील अर्जुन :**

आपल्या पराक्रमाने अर्जुन पृथ्वीतलावर प्रसिद्ध झालाच होता परंतु स्वर्गातसुद्धा त्याच्या पराक्रमाचा प्रभाव होता. स्वर्गात असताना उर्वशीचा शाप स्वीकारला, पण तिला जीवनात स्वीकारले नाही. आपले चरित्र स्वर्गात जाऊनसुद्धा निष्कलंकित ठेवले.

**कृतज्ञ अर्जुन :**

कुरुक्षेत्राच्या युद्धभूमीवर गुरु द्रोणाचार्य त्याचप्रमाणे भीष्माचार्य आणि तत्सम आपले नातेवाईक युद्धासाठी उपस्थित झाले असताना, त्यांच्याबरोबर युद्ध करताना त्यांच्यावर बाण सोडणे, त्यांना मारून राज्य वैभव भोगणे म्हणजे रक्ताने माखलेले ऐश्वर्य भोगण्यासारखे आहे, आमच्यासाठी त्यांना मारण्यापेक्षा त्यांच्यासाठी जीवाचे बलिदान देणे श्रेष्ठ आहे. कौरवांसमवेत युद्ध करून राज्यवैभव भोगण्यापेक्षा गिरी कंदरात जाऊन भिक्षाटन केलेले बरे. परंतु मी यांच्यावर बाण सोडणार नाही. माझ्या स्वार्थासाठी त्यांचा जीव घेणार नाही. यावरून अर्जुनाची संपूर्ण जनमानसांच्या विषयी अत्यंत कृतज्ञ आणि विनयाची भावना होती, हे सिद्ध होते.

**आतां यावरी जें जियावें। तयापासूनि हें बरवे।**
**जे शस्त्रे सांडूनि साहावे। बाण त्यांचे।।२६५।।**

**तयावरी होय जितुकें। तें मरणही वरी निकें।**
**परी येणें कल्मषें। चाड नाहीं।।२६६।।**

**ऐसें देखोनि सकळ। अर्जुनें आपुलें कुळ।**
**मग म्हणे राज्य तें केवळ। निरयभोगु।।२६७।।** अ. १

## शिष्य अर्जुन :

स्वतःची ओळख सांगताना अर्जुन सर्वप्रथम आपले गुरू जे द्रोणाचार्य त्यांचा उल्लेख करतात. गुरूंनी मला धनुर्विद्या दिली, मी द्रोणाचा पार्थ आहे, अशी स्वतःची ओळख अर्जुन देतो.

**मी पार्थु द्रोणाचा केला। जेणे धनुर्वेद मज दिधला।**

धनुर्विद्येमध्ये सर्वश्रेष्ठ होऊनसुद्धा गुरूंच्या विषयी आदर, श्रद्धा, विनय, समर्पण आणि कृतज्ञता इत्यादी गुण अर्जुनात कायम दिसतात.

## सद्‌गुणी अर्जुन :

**अर्जुनाचे सद्‌गुण –** १) सुमन – चांगले मन असलेला, २) शुद्ध मती – चांगली शुद्ध बुद्धी असलेला, ३) अनिंदक – कोणाचीही निंदा न करणारा, ४) अनन्यगती – श्रीकृष्णाच्या बोलण्यावर पूर्ण विश्वास असलेला.

**यालागीं सुमनु आणि शुद्धमती। जो अनिंदकु अनन्यगती।**
**पैं गा गौप्यही परि तयाप्रती। चावळिजें सुखें।।४०।।**

**तरि प्रस्तुत आतां गुणीं इहीं। तूं वांचूनि आणिक नाहीं।**
**म्हणोनि गुज तरी तुझां ठायीं। लपवूं नये।।४१।।** अ. ९

महाभारत काळात अनेक लोक असताना अर्जुनालाच गीता का सांगितली? असा जर प्रश्न असेल, तर त्याचे उत्तर हेच की तत्कालीन लोकांच्या मध्ये अर्जुनाच्या ठिकाणी जे सद्‌गुण होते तसे सद्‌गुण कोणाच्याच ठिकाणी नसल्यामुळे श्रीकृष्णाने गीता ही फक्त अर्जुनालाच सांगितली.

## कुशल प्रश्नकर्ता अर्जुन :

श्रीकृष्णाला किंवा गुरूंना योग्य प्रश्न विचारणारा नेहमी आवडत

असतो. प्रश्न हा नेहमी सुसंगत आणि सर्वांच्या कल्याणाचा असावा. अर्जुन असा प्रश्न विचारायचा की ज्या प्रश्नाने भगवान श्रीकृष्ण प्रसन्न होऊन मोठ्या प्रेमाने आपल्या जवळ असलेल्या ज्ञानाचा खजिना अर्जुनासमोर मोकळा करत असे. अर्जुन सर्वच कार्यामध्ये सर्वच बाजूने अत्यंत कुशल असल्यामुळे त्यास सव्यसाची असेही म्हणत. सव्यसाची म्हणजे उजव्या व डाव्या हाताने सारख्याच गोष्टी करणारा. उजव्या हाताने जे करू शकतो, ते डाव्या हातानेही करू शकतो.

**या किरीटीचिया बोला। तो जगदबंधू संतोषला।**
**म्हणे हो प्रश्न भला। जाणसी करू॥**

**अहो श्री गुरुते जैं पुसावें। तैं येणें माने सावध होआवें॥**
**हे एकची जाणे आघवें। सव्यसाची॥**

## श्रीकृष्णाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेला अर्जुन :

संपूर्ण गीता अर्जुनाला सांगितल्यानंतर ती अर्जुनाला समजली की नाही? सुरुवातीला म्हणजे पहिल्या अध्यायात अर्जुन श्रीकृष्णाचे काही ऐकायलाच तयार नव्हता. तो मोहग्रस्त असल्यामुळे मला सर्व समजते, या भूमिकेत तो श्रीकृष्णाला नीतिशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र इत्यादींच्या माध्यमातून अर्जुन स्वतः श्रीकृष्णाला सांगत होता. म्हणजेच त्याने सुरुवातीला स्वतःची अर्जुन गीताच ऐकविली. परंतु हळूहळू स्व उणिवेची जाणीव झाल्यामुळे शिष्य बनला. मग श्रीकृष्णाने गीता उपदेश केला. हा उपदेश नीट अर्जुनाला कळाला की नाही? त्याचा मोह गेला की नाही? की ऐकून सर्व सोडून दिले? अर्जुनाने आपल्या सरळ अंतःकरणाची कबुली दिली, की तुमच्या कृपेने माझा सर्व मोह नष्ट झाला आहे, मला कोणता संदेह राहिला नाही. म्हणजेच अर्जुन श्रीकृष्णाच्या परीक्षेत सर्वोच्च गुणांनी उत्तीर्ण झालेला विद्यार्थी होय.

आतां मोह असे कीं नाहीं। हें ऐसें जी पुससी काई।
कृतकृत्य जाहलों पाहीं। तुझेपणें।।१५६२।।

गुंतलों होतों अर्जुनगुणें। तो मुक्त जालों तुझेपणें।
आतां पुसणें सांगणें। दोन्ही नाहीं।।१५६३।।

मी तुझेनि प्रसादें। लाधलेनि आत्मबोधें।
मोहाचे तया कांदे। नेदीच उरों।।१५६४।। अ. १८

❀ ✿ ❀